C:\Documents and Settings\Administrator\Desktop\LETTER.docx

**मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खाली एम.टी.डी.सी. विश्रामगृह दस्तरी माथेरान येथे दि.०२/०२/२०१८ रोजी मानीव वनाचे सर्वेक्षण व अंमलबजावणीबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

---

हेमा रमाणी, Bombay Environmental Action Group यांचेकडील पत्र दि. ८/१०/२०१५ व २९/११/२०१६ च्या अनुषंगाने दिनांक २/०२/२०१८ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २.०० वाजता मानीव वनाचे सर्वेक्षण व अंमलबजावणीबाबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१) उप वनसंरक्षक अलिबाग
२) उप विभागीय अधिकारी कर्जत
३) उप अधिक्षक भूमी अभिलेख कर्जत
४) सहाय्यक संचालक नगर रचना रायगड अलिबाग
५) मुख्याधिकारी माथेरान नगर परिषद
६) वनक्षेत्रपाल माथेरान
७) श्री.अनिल वि. पंडीत ,प्रतिनिधी बॉम्बे इन्व्हारमेंट ॲक्शन ग्रुप

बैठकीच्या सुरुवातीला उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली .सदर बैठकीत झालेल्या चर्चेप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२०२/२०१५अंतर्गत intrim Application ६६९/२००१ मध्ये माथेरान गिरीस्थानावरील वन व इतर जमिनीवर असलेल्या वृक्ष आच्छादित क्षेत्राचे सर्वेक्षण करणेबाबत निर्देश दिलेले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे त्यामध्ये काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. माथेरान मधील ५१२ भूखंडापैकी १५५ भूखंडाची मोजणी झालेली आहे असे दिसून आले. उर्वरित सर्व भूखंडाची मोजणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार होणे आवश्यक आहे. त्याबाबत दि.७/०१/२०१७ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीमध्ये उर्वरित भूखंडाची मोजणी करणेबाबत उप वनसंरक्षक अलिबाग व उप अधिक्षक भूमी अभिलेख कर्जत यांना निर्देश देणेत आले होते. तथापी अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे बॉम्बे इन्व्हॉरमेंटल ॲक्शन ग्रुप मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. अनिल पंडीत यांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्याबाबत उप अधिक्षक भूमी अभिलेख कर्जत यांनी सर्व भूखंडाची मोजणी पूर्ण झाली असून १५५ भूखंडाचे मार्कींग झालेले आहे. उर्वरित भूखंडाचे नकाशावर मार्कींग केलेले नाही. त्यामुळे वन विभाग व भूमी अभिलेख विभाग यांनी संयुक्तरित्या प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करुन उर्वरित भूखंडाचे मार्कींग २ महीन्यात पूर्ण करुन देण्याचे बैठकीमध्ये ठरलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही २ महीन्यात पूर्ण करणेबाबत उप वन संरक्षक अलिबाग व उप अधिक्षक भूमी अभिलेख कर्जत यांना निर्देश देण्यात आले.

वरीलप्रमाणे बैठकीत कामकाज होऊन उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**सही /- ---**
**( डॉ. विजय सूर्यवंशी)**
**जिल्हाधिकारी रायगड**

क्र.मशा/जमीन/अ-२/मानीव वन सर्वेक्षण/२०१८
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
अलिबाग, दिनांक २३/०२/२०१८

प्रत :-

१. उप वन सरंक्षक अलिबाग
२. उप विभागीय अधिकारी कर्जत
३. उप अधिक्षक भूमी अभिलेख कर्जत
४. सहाय्यक संचालक नगर रचना रायगड अलिबाग
५. अधिक्षक माथेरान
६. मुख्याधिकारी माथेरान नगर परिषद माथेरान
७. वनक्षेत्रपाल माथेरान
   २/- यांना माहीतीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
८. श्रीम. हेमा रमाणी, बॉम्बे इनव्हॉमेंटल ॲक्शन ग्रुप मुंबई यांना माहीतीसाठी.

**जिल्हाधिकारी रायगड करीता.**